# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.06.2025** **वारःबुधवार**

---

1. देशभरात आज संविधान हत्या दिवस पाळण्यात येणार
2. भारताचा अंतराळवीर शुभांशु शुक्ल यांना अंतराळात घेऊन जाणाऱ्या यानाचं आज प्रक्षेपण
3. इस्रायल आणि इराण यांनी युद्धबंदी कराराचं उल्लंघन केल्याचा अमेरिकेचा आरोप
4. भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा गोल्डन स्पाइक स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी आणि
5. अँडरसन-तेंडुलकर चषक पहिल्या क्रिकेट कसोटीमध्ये इंग्लंडचा भारतावर 5 गडी राखून विजय

**आणीबाणी**

देशभरात आज संविधान हत्या दिवस पाळण्यात येत आहे. 25 जून 1975 रोजी देशात आणीबाणी लागू करण्यात आली; भारतीय संविधान पायदळी तुडवण्यात आलं; या दिवसाचं तसंच आणीबाणीच्या काळात हालअपेष्टा भोगलेल्या नागरिकांच्या योगदानाचं स्मरण करण्यासाठी त्यांना श्रद्धांजली वाहण्याकरिता आजचा दिवस पाळण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून आणीबाणीच्या घटनेबाबत टीका करत या घटनेचा निषेध केला. आणीबाणीची घोषणा हा भारतीय लोकशाहीवरील काळा डाग असल्याचं पंतप्रधानांनी आपल्या भाषणात म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल 1975 मध्ये देशभरात आणीबाणी लागू केल्यासंदर्भात कॉंग्रेसवर टीका केली. ते म्हणाले की ही आणीबाणी देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी नसून तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची सत्ता वाचवण्यासाठी लागू करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणीबाणीसंदर्भात एक पुस्तक लिहिले असून आज या पुस्तकाचे प्रकाशन होणार असल्याचं शहा यांनी सांगितलं. हे पुस्तक आणीबाणीच्या काळातील संघर्ष आणि विकासावर आधारित असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**राजनाथ**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज चीनमधल्या क्वींगडाव इथं शांघाय सहकार्य संघटना अर्थात SCO मध्ये सहभागी देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत भारताचं प्रतिनिधीत्व करत आहेत. दोन दिवसांच्या या बैठकीत राजनाथ सिंह यांच्याबरोबर उच्चस्तरीय अधिकारी सहभागी होतील. स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षितता, दहशतवादविरोधी एकत्रित प्रयत्न आणि परस्परसहकार्य या विषयांवर या बैठकीत चर्चा होण्याची अपेक्षा आहे. राजनाथ सिंह हे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता यासाठी भारताच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करतील. तसंच दहशतवाद संपवण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचं आवाहन करतील. याशिवाय राजनाथ सिंह चीन आणि रशिया यांच्या संरक्षण मंत्र्यांबरोबर द्विपक्षीय चर्चाही करतील.

**एक्सिओम-4**

भारताचा अंतराळवीर शुभांशु शुक्ल यांना अंतराळात घेऊन जाणाऱ्या एक्सिओम-4 या यानाचे आज भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी 12 वाजून 1 मिनिटांनी प्रक्षेपण होणार आहे. अमेरिकेतल्या फ्लोरिडा इथल्या केनेडी अंतराळ केंद्रातून हे प्रक्षेपण करण्यात येईल. इस्रो ने सांगितलं की, 28 तासांच्या प्रवासानंतर हे यान उद्या दुपारी साडेचार वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाशी जोडले जाईल. 14 दिवसांच्या या ऐतिहासिक मोहिमेच्या माध्यमातून अमेरिका, भारत, पोलंड आणि हंगेरी अशा चार

देशांचे वैज्ञानिक पृथ्वीच्या लगतच्या कक्षेसंदर्भात वैज्ञानिक प्रयोग करणार आहेत. शुभम शुक्ल हे अंतराळात जाणारे दुसरे भारतीय आहेत.

**<u>विमान दुर्घटना</u>**

नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू यांनी अहमदाबादमध्ये नुकत्याच कोसळलेल्या एअर इंडियाच्या विमानाच्या ब्लॅक बॉक्सची तपासणी विमान अपघात तपास विभागाकडून केली जात असल्याचं सांगत ब्लॅक बॉक्स चौकशीसाठी परदेशात पाठवला जाणार असल्याचं वृत्त पुण्यातील एका कार्यक्रमादरम्यान काल माध्यमांशी बोलताना फेटाळून लावलं. दरम्यान, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने दिल्ली आणि मुंबईसह देशातील प्रमुख विमानतळांची सखोल पाहणी केली यामध्ये विमान वाहतूक परिसंस्थेत अनेक कमतरता आढळून आल्या आहेत.

**<u>इराण-इस्रायल</u>**

इस्रायल आणि इराण यांनी युद्धबंदी कराराचं उल्लंघन केल्याचा आरोप करत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी दोन्ही देशांवर टीकेची झोड उठवली आहे. इस्रायलनं यापुढे इराणवर बॉम्बहल्ले करू नये, असा सल्ला आपण इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांना दिल्याचा ट्रंप यांनी सांगितलं. युद्धबंदी झाल्यानंतर दोन्ही देशांनी काही तासांतच एकमेकांवर प्रतिहल्ले केले असून इस्रायल आणि इराण दोन्ही देशांनी आपण युद्धबंदीचं पालन करत असून हल्ले समोरून होत असल्याचा आरोप केला आहे. ट्रंप यांच्या बरोबर झालेल्या चर्चेनंतर इराणवर हल्ले करणं इस्रायलनं थांबवलं असल्याचं नेत्यानाहू यांनी सांगितलं. तर इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्किन यांनी इस्रायलनं हल्ले थांबवले तर आपणही हल्ले करणार नसल्याचं स्पष्ट केलं.

**<u>हाऊती</u>**

येमेनमधल्या हाऊती बंडखोरांनी मात्र या भागातली युद्धबंदी धुडकावून लावत इस्रायलविरुद्ध आपण लढत राहणार असल्याचं जाहीर केलं आहे. इस्रायल गाझा पट्टीत अजूनही हल्ले करत असून आम्हीही थांबणार नाही कारण त्यांना फक्त युद्धाचीच भाषा समजते, असा आरोप हाऊतींकडून समाजजमाध्यमावर करण्यात आला आहे.

**<u>भारत नेपाळ बैठक</u>**

भारत आणि नेपाळदरम्यान सुरक्षाविषयक मुद्दयांवरील 16 वी आढावा बैठक पुण्यात पार पडली. या दोन दिवसीय बैठकीत या शेजारील राष्ट्रांनी संरक्षण सहकार्यावर चर्चा केली. शस्त्रास्त्र पुरवठा, प्रशिक्षण, एकत्रित लष्करी सराव, आपत्ती निवारण मोहिमा आणि लष्कर देवाणघेवाण आदी मुद्द्यांवर उभय देशांमध्ये परस्पर सहकार्याची चर्चा झाली. तसंच दोन्ही देशांच्या प्रतिनिधिमंडळाने सार्वजनिक आणि खाजगी लष्करी उत्पादन सुविधांना भेट देत परस्पर लष्करी भागीदारीच्या शक्यतांचा पडताळा घेतला.

**<u>मॉरिशस पंतप्रधान चर्चा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मॉरिशसचे पंतप्रधान डॉक्टर नविनचंद्र रामगुलाम यांचाशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. यासंदर्भात माहिती देताना पंतप्रधान मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे की, उभय देशांमधील धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचं दोन्ही नेत्यांनी सांगितलं. मोदी यांनी व्हिजन महासागर आणि भारताच्या शेजारील राष्ट्र आधी धोरणाच्या अनुषंगाने मॉरिशसच्या विकास प्राधान्यांप्रती भारताच्या दृढ वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. दोन्ही नेत्यांनी विकास भागीदारी, क्षमता बांधणी, संरक्षण, सागरी सुरक्षा, डिजिटल पायाभूत सुविधा इत्यादि संदर्भात परस्पर सहकार्याविषयी सविस्तर चर्चा केली.

**<u>निधन-मुंबई</u>**

भारताचे माजी फिरकी गोलंदाज दिलीप दोशी यांचं सोमवारी रात्री लंडनमध्ये हृदयविकारानं निधन झालं. ते 77 वर्षांचे होते. उत्कृष्ट फिरकी गोलंदाज आणि यशस्वी हिंदी क्रिकेट समालोचक म्हणून ते लोकप्रिय होते. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आठशे

अठ्ठ्याण्णव बळी घेणाऱ्या दिलीप दोशी यांनी 238 प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये 43 वेळा 5 बळी घेतले. एका सामन्यात दहा बळी घेण्याचा विक्रम त्यांनी सहा वेळा केला होता.

**नीरज**

भारताचा भालापटू नीरज चोप्रा यानं चेक प्रजासत्ताकमधील ऑस्ट्रावा इथं झालेल्या गोल्डन स्पाइक 2025 स्पर्धांमध्ये भाला फेकीचं सुवर्णपदक पटकावलं आहे. ऑलिंपिक मध्ये दोन वेळा पदक विजेत्या नीरज चोप्रानं काल 85 पूर्णांक 29 मीटर भालाफेक करत सुवर्णपदकावर आपलं नाव कोरलं. दक्षिण आफ्रिकेच्या डॉव स्मिटने यानं दुसरं तर ग्रेनाडाच्या अँडरसन पीटर्सनं तिसरं स्थान मिळवलं. गेल्या आठवड्यात पॅरिसमध्ये डायमंड लीग स्पर्धा जिंकल्यानंतर नीरजनं सलग सुवर्ण कामगिरी केली आहे. नीरज येत्या 5 जुलै रोजी बंगळुरूमध्ये नीरज चोप्रा क्लासिक या भारतातल्या पहिल्या जागतिक भाला फेक स्पर्धेत सहभागी होत आहे.

**क्रिकेट**

अँडरसन - तेंडुलकर चषकाच्या हेडिंग्ले इथं झालेल्या पहिल्या क्रिकेट कसोटीमध्ये इंग्लंडने भारतावर 5 गडी राखून विजय मिळवला. कालच्या 5व्या दिवशी इंग्लंडने बेन डकेटच्या 149 तसच झॅक क्रॉली आणि ज्यो रूट यांच्या अर्धशतकाच्या जोरावर 371 धावांचं आव्हान सहज पार केलं. दुसरी कसोटी 2 जुलै पासून बर्मिंगहॅम इथं सुरू होणार आहे.

**हवामान**

कोकण गोवा मध्य महाराष्ट्रात आज मुसळधार पाऊस पडेल तर गुजरात, अंदमान निकोबार द्वीपसमुह, कोंकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य प्रदेशात पुढील पांच दिवस हलका ते माध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार